महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

## नियामक मंडळाची १५ वी बैठक दि.११.०८.९८

मा. ना. एकनाथरावजी खडसे, मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची १५ वी बैठक दि.११.०८.९८ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. १५/१

''ठराव करण्यात येतो की १४ व्या बैठकीमध्ये पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. १५/२

''मुख्यत:जादा पाणीवापरामुळे जमिनी खराब होत असल्याने पाणीवापर काटकसरीने होण्यासाठी कार्यवाही करावी, जमीन लागवडीयोग्य करण्याबाबत जी तरतूद कायद्यामध्ये आहे त्यामध्ये बदल करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव करावा व खराब जमिनी लागवडीयोग्य करण्यासाठी राबवावयाच्या चर योजना एकतर संबंधित लाभधारकांकडून ठेवी घेऊन त्या रकमेतून अथवा शासनाकडून ह्या योजनांसाठी विवक्षित अनुदान मिळवून नंतरच राबवाव्यात अशी शिफारस नियामक मंडळ करीत आहे.

लाभधारकांकडून घेतलेल्या ठेवीतून अथवा शासनाकडून उपलब्ध करुन घेतलेल्या विवक्षित अनुदानातून ज्या चर योजना राबविण्यात येतील त्या, महामंडळाकडील प्रकल्पांच्या लाभक्षेत्राच्या ३% पर्यंतच्या संचित (cumulative) क्षेत्र असलेल्या, चर योजनांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार क्षेत्रीय मुख्य अभियंता यांना देण्यात येत आहेत. मात्र या योजनांसाठी नियामक मंडळाच्या परवानगीशिवाय निधी उपलब्ध करुन देऊ नये. ३% पेक्षा जास्त संचित क्षेत्र असलेल्या (प्रकल्पाच्या लागवडीलायक क्षेत्राच्या) अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.''

ठराव क्र. १५/३

''१. ठराव करण्यात येतो की, लघु पाटबंधारे प्रकल्पातून (को. प. बंधाऱ्यासह) पिण्यासाठी, उपयुक्त जलसाठ्याच्या १५% मर्यादेपर्यंत पाणी कपात करुन बिगर

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

DIR_MEET_15

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

सिंचन मागण्यांना परवाने देण्याच्या कार्यकारी संचालक यांनी केलेल्या कार्यवाहीस पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देण्यात येत आहे.

२. ठराव करण्यात येतो की, यापुढे मोठ्या व मध्यम प्रकल्पांमधून उपयुक्त जलसाठ्याच्या १५% मर्यादेपर्यंत पाणी कपात करुन बिगर सिंचन मागण्यांना परवाने देण्याचे अधिकार महामंडळाच्या प्रादेशिक मुख्य अभियंता यांना देण्यात येत आहेत व लघु प्रकल्पातून (को.प. बंधाऱ्यासह) उपयुक्त जलसाठ्याच्या १५% पर्यंत पाणी कपात करुन फक्त पिण्यासाठी पाणी परवाने देण्याचे अधिकारही महामंडळाच्या प्रादेशिक मुख्य अभियंता यांना देण्यात येत आहेत. उपयुक्त जलसाठ्याच्या १५% वरील व २५% इतक्या मर्यादेपर्यंतचे प्रस्ताव नियामक मंडळाकडून मान्य करुन घेण्यात यावेत.

३. परिशिष्ट क्र.२/१ मधील बिगर सिंचन पाणी पुरवठा मिळण्याबाबतच्या ६ योजनांचे प्रस्तावांना, सदर प्रस्तावांचा पाणी वापर संबंधित प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजनामध्ये समावेश केला जाईल व दोन महिन्यांच्या पाणीपट्टीएवढी अनामत रक्कम महामंडळाकडे पाणी वापर करणारी संस्था भरेल व दोन महिन्यांचा (१९९० च्या शासन निर्णयानुसार) साठा (storage) स्वखर्चाने करील, या अटींवर नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.१५/४

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील कामांसाठी पूर्वनिर्धारित निकषास पात्र ठरणाऱ्या, योग्य वर्गवारीच्या, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांची निवडसूची करण्याची प्रक्रिया ही ऑगस्ट ९८ पासून सलग (continous) करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. ऑगस्ट ९८ पासून सुरु होणाऱ्या नवीन नोंदणीदारांना ही नोंदणी तीन वर्षाकरिता देण्याचे व त्यासाठीची नोंदणीची फी सध्याच्या दराच्या ३ पट करण्याचे अधिकार कार्यकारी समितीला देण्यात येत आहेत.''

ठराव क्र. १५/५

''ठराव करण्यात येतो की, ठराव क्र. १४/४ नुसार, उभारण्यात आलेल्या रु.१८० कोटी कर्जाचा ३० जून १९९८ पर्यंतचा कालावधी ३० जून १९९८ ते ३१ डिसेंबर १९९८ असा वाढविण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

DIR_MEET_15

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

ठराव क्र. १५/६

''ठराव करण्यात येतो की,

१. इ.स. १९९८-९९ या आर्थिक वर्षात ठराव क्र.१४/२(१) नुसार ठरल्याप्रमाणे रु.१२०० कोटी ऐवजी रु.१६७० कोटी टप्प्याटप्प्याने उभारण्यास नियामक मंडळ मान्यता देत आहे.

२. इ.स. १९९८-९९ या आर्थिक वर्षात खाजगी रोखे विक्री मालिका-४ नुसार उभारण्यात आलेल्या रु.३०२.८२ कोटी रोखेविक्री प्रक्रियेसाठी प्रमुख आयोजकांचे शुल्क, अपफ्रंट प्रोत्साहन रक्कम, माहितीपत्रक व फॉर्म छपाई व निविदा जाहिरात, रजिस्ट्रार्सची फी, बँकर्सची फी, बॉंड सर्टिफिकेटस् (होलोग्रामसह), रेटींग एजन्सी फी, ट्रस्टी फी तसेच शासनाची हमी फी इ. खर्चापोटी खालीलप्रमाणे खर्च करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.''

रुपये लाख

| | | |
|---|---|---|
| १. | अपफ्रंट प्रोत्साहन रक्कम | ६०५.६४ |
| २. | माहितीपत्रक व फॉर्म छपाई (निविदा जाहिरातीसह) | ०.६० |
| ३. | रजिस्ट्रार्सची फी | ०.७८ |
| ४. | बँकर्सची फी | ०.५० |
| ५. | प्रमुख आयोजकांची फी | ६०.५६ |
| ६. | बॉंड सर्टिफिकेटस्, रेटींग एजन्सी, ट्रस्टी, लिस्टिंग फी इ. | ३५.०० |
| ७. | शासनाची हमी फी | ६०५.६४ |
| | एकूण : | १३०८.७२ |

ठराव क्र.१५/७

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाने पूर्ण करावयाच्या पाटबंधारे प्रकल्पासाठी सन ९८-९९ मध्ये आवश्यक निधी (रु.२६५६ कोटीपर्यंत) उपलब्ध करुन घेण्यासाठी रोख्यांव्यतिरिक्त बँकामार्फत तसेच वित्तीय संस्था अथवा/आणि बाह्य अर्थसहाय्या (ई सी बी) द्वारे दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्यासाठी नियामक मंडळ मान्यता देत आहे. अशाप्रकारचे दीर्घ मुदत कर्ज योग्य व्याज दराने कुठल्याही एका वा अनेक बँकांकडून, वित्तीय संस्थांकडून

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

तसेच बाह्य अर्थसहाय्या (ई सी बी) मार्फत थेट अथवा अधिकृत वित्त पुरवठा संस्थेच्या माध्यमातून योग्य त्या मुदतीवर व अटी व शर्तीवर घेण्यासाठी तसेच त्याकरिता सर्व प्रकारच्या कागदपत्रांवर, दस्तऐवजांवर महामंडळातर्फे सह्या करणे, संबंधितांना सह्यांचे प्राधिकार महामंडळातर्फे प्रदान करणे व इतर सर्व आवश्यक त्या कृती/कार्यवाही करणे हे सर्व अधिकार मा. अध्यक्षांच्या सहमतीने कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत. तथापि अशा प्रकारची कार्यवाही ही शासनाच्या उच्चाधिकार समितीने या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतरच करण्यात यावी.''

ठराव क्र.१५/८

''ठराव करण्यात येतो की,

१. ०१.०७.९८ पासून महामंडळाच्या कार्यकक्षेतील प्रकल्पांसाठी सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीचे दर महाराष्ट्र शासनाच्या ०१.०७.९८ पासून लागू होणाऱ्या दराप्रमाणे आकारण्यात यावेत.

२. को.प. बंधाऱ्यातून, नदीतून (जेथे धरणाच्या पाण्याच्या साठ्यामधून बारमाही पाणी सोडण्यात येते), तसेच धरणातून व कालव्यातून पाणी उचलून, ऊस बागायतीसाठी (वाढवा धरुन) करण्यात आलेल्या खाजगी उपसा सिंचन योजनांच्या पाणी वापराबद्दलचे पाणीपट्टीचे दर (लागण केल्यापासून पिक निघेपर्यंत) रु.२००० प्रति हेक्टर असा राहील.''

ठराव क्र. १५/९

''ठराव करण्यात येतो की, श्री. प्रतापराव बेहेरे, निवृत्त न्यायाधिश यांची महामंडळाचे 'कायदे सल्लागार' म्हणून दि. १२.११.९७ पासून दि.३१.१२.९८ पर्यंतच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.१५/१०

''ठराव करण्यात येतो की, राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत १९९९ मध्ये आयोजित करावयाच्या आठव्या राष्ट्रीय जलसंधारण अधिवेशनासाठी महाराष्ट्र राज्याच्या वतीने रु.५ लक्ष मर्यादेपर्यंत खर्च करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.''

मा. मंत्री (प) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

ठराव क्र.१५/११

''ठराव करण्यात येतो की,

१. कृष्णा खोऱ्यातील भूसंपादन व पुनवर्सनाची कामे त्वरेने होण्यासाठी आयुक्त, पुणे यांना १९९८-९९ या आर्थिक वर्षात रोजंदारीवरील कर्मचारी व इतर कार्यालयीन सुविधा (फॅक्स मशीन, सायक्लोस्टाईल, दूरध्वनी, फर्निचर, संगणक, लेखनसामुग्री इ.) इत्यादी सोईसवलती महामंडळामार्फत देण्यास व त्यासाठी पुढीलप्रमाणे रु.१,३३,७६,००० फक्त खर्च करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

| क्र. | बाब | अपेक्षित खर्च रु. लक्ष |
|---|---|---|
| १. | फॅक्स मशीन (कागदासह) | ४.०० |
| २. | झेरॉक्स मशीन (कागदासह) | १२.५० |
| ३. | टंकलेखन यंत्रे (टंकलेखकासह) | ७.८० |
| ४. | सायक्लोस्टाईल मशीन | ०.८० |
| ५. | फर्निचर | १०.०० |
| ६. | रोजंदारी कर्मचारी वेतन | ३३.६६ |
| ७. | लेखनसामुग्री | ४६.०० |
| ८. | नवीन दूरध्वनी | ८.०० |
| ९. | संगणक यंत्रे | ११.०० |
| | एकूण : | १३३.७६ |

२. वरील बाब क्र.१ ते ९ वरोल खर्च करण्यापूर्वी याच कामांसाठी १९९७-९८ मध्ये ठराव क्र. ८/२ नुसार उपलब्ध करुन दिलेल्या सोईसवलतीच्या खर्चाचा तपशील आयुक्त, पुणे यांचेकडून घेण्यात यावा. तसेच पूर्वी दिलेल्या सुविधा आता देणे आवश्यक आहे का याची तपासणी कार्यकारी संचालक यांनी करावी.

३. कृष्णा खोऱ्यातील भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामांसाठी नवीन वाहने खरेदी करु नयेत.

४. महसूल खात्यास कृष्णा खोऱ्यातील भूसंपादन व पुनर्वसन कामांसाठी अंदाजे ३५ निरीक्षण वाहने भाड्याने घ्यावयाची झाल्यास, त्यासाठी परवानगी देण्याचे व निरीक्षण वाहनांच्या भाड्याची देयके अदा करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक

मा. मंत्री (पु.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

यांना देण्यात येत आहेत. कार्यकारी संचालक यांच्या परवानगीशिवाय महसूल खात्याने भाड्याने वाहने घेऊ नयेत.''

ठराव क्र. १५/१२

''ठराव करण्यात येतो की,

१. खालील ३ प्रकल्पांच्या सुधारित अंदाजपत्रकास नियामक मंडळ सुधारित प्रशासकीय मान्यता देत आहे.

| | प्रकल्पाचे नाव | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत कोटी रुपये |
|---|---|---|
| १. | कृष्णा खोऱ्यातील सरितामापन केंद्राची बृहत् जालिका | १.७८ |
| २. | भीमा खोऱ्यातील सरितामापन केंद्राची बृहत् जालिका | २.२१ |
| ३. | महिंद लघु पाटबंधारे तलाव, ता.पाटण जि. सातारा | ३.५५ |

२. खांबोली लघु पाटबंधारे तलाव, ता.मुळशी, जि.पुणे व अणे पेमदरा लघु पाटबंधारे तलाव, ता.जुन्नर, जि.पुणे या प्रकल्पांच्या सुधारित अंदाजपत्रकांवर महामंडळाच्या तांत्रिक सल्लागारांचे अभिप्राय घेऊन त्यांच्या शिफारशींचा विचार करुन अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. यांना या दोन लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या सुधारित अंदाजपत्रकांना मान्यता देण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.''

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

DIR_MEET_15